दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक ११२ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शुक्रवार दि.१६ जुलै २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# दिबांच्या नावासाठी क्रांतिदिनी मशाल मोर्चा

**दै.रायड नगरी । पनवेल**

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याच्या मागणीसाठी ९ ऑगस्ट अर्थात क्रांती दिनी जासई येथे मशाल मोर्चा काढण्याचा निर्णय पनवेल येथे झालेल्या समितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे.**



१० जूनला भव्य साखळी आंदोलन आणि त्यानंतर २४ जून रोजी झालेल्या सिडको घेराव आंदोलनात लाखो भूमिपुत्रांच्या प्रत्यक्ष साक्षीने १५ ऑगस्टपर्यंत राज्य सरकारला मुदत देण्यात आली. त्यानंतर विमानतळाचे काम बंद करण्याचाही इशारा दिला आहे. या आंदोलनाची पुढील रूपरेषा ठरविण्यासाठी नुकताच पनवेल येथील ज्योतिबा महात्मा फुले हॉलमध्ये (आ–गरी समाज सभागृह) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी समितीत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. त्या अनुषंगाने ९ ऑगस्ट या क्रांती दिनी दि.बांचे जन्मगाव असलेल्या जासईमध्ये मशाल मोर्चा काढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या बैठकीला समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी खासदार जगन्नाथ पाटील, कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, अतुल पाटील, संतोष केणे, गुलाबराव वझे, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेंद्र पाटील, नंदराज मुंगाजी, के. के. म्हात्रे, ॲड. मदन गोवारी, दीपक म्हात्रे, सीमा घरत, तसेच समितीचे इतर सदस्य उपस्थित होते.

पाचवेळा आमदार, दोन वेळा खासदार, विरोधी पक्षनेते, नगराध्यक्ष अशी दमदार कारकीर्द कामगिरी दि. बा. पाटील यांची राहिली आहे. आपल्या बुलंद आवाजाने महाराष्ट्र विधीमंडळात तसेच खासदार म्हणून दिल्लीच्या सार्वभौम संसदेत शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न त्यांनी पोटतिडकीने मांडले. मंडल आयोगाच्या अंमलबजावणीसाठी आणि त्यानंतर ओबीसी समाजात जागृती करण्यासाठी त्यांनी सारा महाराष्ट्र पिंजून काढला. संयुक्त महाराष्ट्र चळवळ, सीमा प्रश्न अशा अनेक जनलढ्यात त्यांनी हिरीरीने भाग घेऊन तुरुंगवास भोगला आहे. त्यामुळे त्यांचे हे कार्य नव्या पिढीला स्फूर्तिदायी ठरावे यासाठी त्यांच्या कर्मभूमीत त्यांची स्मृती जागरूक राहावी यासाठी नवी मुंबईत होत असलेल्या विमानतळाला त्यांचेच नाव द्यावे, अशी मागणी विविध पक्ष, सामाजिक संघटनांनी तसेच भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे. राज्य सरकारने याचा गांभीर्याने विचार करून दि. बा. पाटील यांचेच नाव नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाला द्यावे, हि २००८ सालापासूनची मागणी असून दिबासाहेबांच्या नावासाठी लढा अधिक व्यापक करण्यात येणार आहे.

# सिडको मेट्रो मार्ग क्र. १ च्या परिचालन आणि देखभालीकरिता महामेट्रोला देण्यात आले स्वीकारपत्र

## मार्ग क्र. १ च्या अंमलबजावणीच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सिडको महामंडळाकडून विकसित करण्यात येत असलेल्या नवी मुंबई मेट्रो मार्ग क्र. १ च्या परिचालन आणि देखभाल (ऑपरेशन अँन्ड मेन्टेनन्स) सेवांकरिता, सिडकोकडून नुकतेच महामेट्रोला स्वीकारपत्र (एलओए) देण्यात आले. या संदर्भात लवकरच सिडको आणि महा मेट्रो यांच्यात करारनामा करण्यात येणार आहे.



नवी मुंबईतील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या आणि नवी मुंबईतील नोड परस्परांना अधिक सुलभरीत्या जोडले जावेत या उद्देशाने सिडकोतर्फे नवी मुंबई मेट्रो प्रकल्पांतर्गत एकूण ४ उन्नत मार्ग (एलिव्हेटेड कॉरिडॉर) विकसित करण्यात येत आहेत. त्यांपैकी ११.१० कि.मी. च्या ११ स्थानकांसह तळोजा येथे आगार असलेलेल्या बेलापूर ते पेंधर या मार्गावर मेट्रोची यशस्वी चाचणी घेण्यात आली आहे. सद्यस्थितीत मार्ग क्र. १ वर उभारण्यात येणाऱ्या ११ स्थानकांपैकी १ ते ६ स्थानकांच्या उभारणीची कामे लवकरात लवकर पूर्ण करणे आणि प्रकल्पासाठी आर्थिक स्त्रोत निर्माण करणे, तसेच या क्षेत्रातील महामेट्रोचा अनुभव व कार्यकुशलता विचारात घेऊन सिडकोने महा मेट्रोची नियुक्ती केली. महा मेट्रो कंपनीस नुकत्याच यशस्वीरीत्या कार्यान्वित झालेल्या नागपूर मेट्रो टप्पा १ आणि पुणे मेट्रो प्रकल्पांतर्गत विकसित करण्यात येत असलेल्या मार्ग क्र. १ आणि २ च्या बांधणी, अंमलबजावणी आणि परिचालन आणि निगराणीचा अनुभव आहे. या मार्गाच्या अभियांत्रिकी सहाय्यासाठी महा मेट्रोकडून २० तज्ज्ञ अभियंत्यांच्या गटाची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर मार्गावरील परिचालन आणि देखभाल सेवांकरिता सिडकोला रु. ८८५ कोटी इतका खर्च अंदाजित आहे. महामेट्रोशी परिचालन आणि देखभाल सेवा प्रदान करण्याच्या कराराचा कालावधी हा, या मार्गावर वाणिज्यिक परिचालन सुरू होण्याच्या तारखेपूर्वी १ वर्ष आणि वाणिज्यिक परिचालन सुरू झाल्याच्या तारखेपासून पुढील १० वर्षे इतका असणार आहे. सदर मार्ग कार्यान्वित झाल्यानंतर नवी मुंबईकरांना लवकरच पर्यावरणस्नेही आणि आरामदायक प्रवासाचा एक उत्तम पर्याय निर्माण होणार आहे.

नवी मुंबईतील मेट्रो प्रकल्पाची नवी मुंबईकरांना अनेक वर्षे प्रतीक्षा आहे. लवकरात लवकर हा मेट्रो प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असून प्रकल्पासमोरील सर्व अडथळे आम्ही दूर केले आहेत. महा मेट्रोने नागपूर मेट्रो विक्रमी वेळेत पूर्ण करून दर्जेदार प्रकल्प उभा केला. पुणे मेट्रोचे काम देखील महा मेट्रो वेगाने करत आहे. त्यामुळे त्यांची आजवरची कामगिरी बघता नवी मुंबई मेट्रो देखील लवकरात लवकर कार्यान्वित करून प्रवाशांच्या सेवेत रुजू होईल, असा मला विश्वास आहे.

**: एकनाथ शिंदे,
नगरविकास मंत्री, महाराष्ट्र**

मेट्रो मार्ग क्र. १ च्या अभियांत्रिकी सहाय्यासाठी महा मेट्रोची नियुक्ती करण्यात आल्यानंतर, या मार्गावर परिचालन आणि देखभाल सेवा पुरविण्याकरिता सिडकोकडून महा मेट्रोला स्वीकारपत्र देण्यात आले आहे. यामुळे या मार्गावरील कामे वेगाने पूर्ण होऊन, लवकरच या मार्गावर प्रवासी सेवा सुरू करणे शक्य होईल. सिडकोच्या सर्व महत्वाकांक्षी प्रकल्पांना गती देणे हे माझे मुख्य उद्दीष्ट आहे. त्याचाच प्रारंभ मेट्रो प्रकल्पाच्या या महत्वपूर्ण निर्णयाने झाला आहे.

**डॉ. संजय मुखर्जी,
उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय
संचालक, सिडको**

## संक्षिप्त...

### मोदी सरकारचा राज्यांना धोक्याचा इशारा, निर्बंध वाढणार?




**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशात आलेली कोरोनाची दुसरी लाट हळूहळू ओसरत चालली आहे. मात्र अधूनमधून कोरोना रुग्णांच्या संख्येत वाढ होत असल्यानं चिंता कायम आहे. त्यातच कोरोना रुग्णांची संख्या कमी झाल्यानं अनेक राज्यांनी निर्बंध शिथिल केले आहेत. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणांवरील गर्दी वाढली आहे. पर्यटनस्थळीदेखील पर्यटक मोठ्या संख्येनं जाऊ लागले आहेत. याबद्दल केंद्र सरकारनं स्पष्ट शब्दांत चिंता व्यक्त केली आहे.

लॉकडाऊनमधून सवलत दिली जात असताना अनेक ठिकाणी कोरोना प्रतिबंधात्मक नियमांचं उल्लंघन होत असल्याचं दिसत आहे. मंडया, बस स्थानकांसह पर्यटनस्थळांवर मोठी गर्दी दिसून येत आहे. त्यामुळे केंद्रीय आरोग्य सचिवांनी सर्व राज्यांना पत्र लिहिलं आहे. सध्या दिसत असलेल्या बेजबाबदारपणामुळे तिसरी लाट येऊ शकते आणि समस्या वाढू शकतात, असा धोक्याचा इशारा केंद्रीय सचिवांनी पत्रातून दिला आहे. कोविड प्रतिबंधात्मक नियम पाळले जातील याची काळजी घेण्याच्या सूचना सचिवांनी दिल्या आहेत.

बुधवारी केंद्रीय गृह सचिवांनी सर्व राज्य सरकारांना पत्र पाठवलं होतं. त्यानंतर आता केंद्रीय आरोग्य सचिवांनी सर्व राज्यांना पत्र पाठवून काळजी घेण्याचे आणि नियम पाळण्याचे आदेश दिले आहेत. 'डोंगराळ भागातील पर्यटनस्थळांवर कोविड प्रतिबंधात्मक नियमांचं सर्रास उल्लंघन होत आहे. त्या ठिकाणी नियम पाळले जातील याची काळजी घ्या. नियमांचं उल्लंघन होत असल्यास जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करा,' अशा स्पष्ट सूचना राज्य सरकारांना आणि केंद्रशासित प्रदेशांना देण्यात आल्या आहेत.

# अलिबागचे मा.आ.मधुकर ठाकूर यांचे निधन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

काँग्रेस नेते, अलिबाग–उरण मतदार संघाचे माजी आमदार मधुकर ठाकूर यांचे आज पहाटे निधन झाले.

पहाटे ५.१० मिनिटांनी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ते ७४ वर्षांचे होते. आजच म्हणजे १५ जुलै रोजी त्यांचा वाढदिवस आहे.



मागील ३ ते ४ वर्षांपासून ते आजारी होते. झिराड ग्रामपंचायतीच्या सरपंचपदापासून त्यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. त्यानंतर जिल्हा परिषद सदस्य आणि २००४ ते २००९ या काळात अलिबाग – उरण मतदार संघाचे ते आमदार होते.

रायगड जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष, प्रदेश काँग्रेसचे विशेष निमंत्रित सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे. अलिबाग तालुक्यातील सातिर्जे या मूळ गावी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार झाले.

# रोह्यातील मंडळ अधिकाऱ्याला लाच घेताना पकडले

## सातबारा उताऱ्यावर नाव नोंदणीसाठी घेतली अडीच हजारांची लाच

**दै.रायगड नगरी । रोहा**

बक्षिसपत्र केलेल्या जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर नावनोंदणी करण्यासाठी अडीच हजार रुपयांची लाच स्वीकारताना रोहा तालुक्यातील घोसाळे मंडळ अधिकारी राजेश वसंत जाधव याला रायगडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले आहे.



यातील तक्रारदार यांच्या वडिलांनी त्यांच्या मालकीची जमीन तक्रारदार यांना बक्षिसपत्र रजिस्टर करून दिली होती. त्याची सातबारा उताऱ्यावर नोंद करून त्याची प्रत उपलब्ध करून देण्यासाठी मंडळ अधिकारी राजेश जाधव यांनी ३ हजार रुपये इतक्या लाचेची मागणी केली होती. याबाबत रायगडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यात आली होती.

यादरम्यान पडताळणी सुरु असताना तडजोडीअंती लाचेची रक्कम कमी करून ती अडीच हजार रूपये इतकी करण्यात आली. ही रक्कम जाधव यांचा सहकारी महादेव मोरे याला स्वीकारण्यास सांगितली. जाधव यांच्यासमक्ष ही रक्कम स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले.

पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून दोघांनाही अटक केली आहे. पोलीस निरीक्षक किशोर साळे, सहायक फौजदार अरुण घरत, कर्मचारी दीपक मोरे, सूरज पाटील, कौस्तुभ मगर यांनी ही यशस्वी कारवाई केली.

# माणगांव भूमिअभिलेख कार्यालयातील अधिकाऱ्याचा अजब कारभार

## कोरोनाच्या नावाखाली माहिती देण्यास केली जाते टाळाटाळ

**दै.रायगड नगरी । माणगाव**

माणगांव उपआधिक्षक भूमि अभिलेख कार्यालयातील अधिकारी तसेच कर्मचारी यांचा मनमानी व अजब कारभार कार्यालयात चालू आहे ते म्हणजे शेतकऱ्याने कुठल्याही प्रकारे माहिती अर्ज देण्यासाठी कार्यालयात गेले असता तो अर्ज एका ट्रे मध्ये ठेवायला सांगून त्यांची पोच मागीतली तर ती आम्ही देत नाही. का विचारले तर तुम्ही दिलेल्या अर्जाला आम्ही तीन दिवस हातच लावत नाही असे बिनधास्त पणे हे अधिकारी व कर्मचारी सांगत आहेत कारण कोरोना होईल म्हणून.

सविस्तर वृत्त असे की माणगांव तालुका हा जिल्हाच्या दिशेने वाटचाल करत असून आज प्रांत, तहसिल, पोलिस ठाणे, पंचायत समिती कार्यालय, कृषी कार्यालय अशी मोठ–मोठी कार्यालय आज माणगांव नगरीत उभी असून या कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी कर्मचारी हे कोरोना प्रादुर्भाव असताना देखील सर्वसामान्य जनतेला सहकार्य करून त्यांची कामे नियमितपणे करत असून आद्यप पर्यंत कुठे ही या कार्यालयातून जनतेला दुजाभाव करताना कोणी अधिकारी किवा कर्मचारी दिसला नाही, परंतु माणागांव भूमि अभिलेख कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी याचा कोरोना प्रादुर्भावाच्या ना–वाखाली चाललेला मनमानी कारभार पाहुन तर थक्क व्हाल ते म्हणजे असे की माहीती मागवलेल्या आर्जाची पोच न देणे व त्या अर्जाला तिन दिवस हातच न लावणे असा आजब कारभार या कार्यालयात चालु आहे. हे अधिकारी कर्मचारी शेतकऱ्यांना असे सांगतात की आम्ही अर्जाला तिन दिवसाने हात लावतो तुम्ही पाच सहा दिवसांनी या तुम्ही एवढे कडक नियम लावताय तर जिल्हातील तुमच्या वरिष्ठ अधिकारी याचे लेखी पत्र तुमच्या कडे आहे का. तर हे अधिकारी व कर्मचारी नाही बोलून आम्ही कोरोना प्रादुर्भाव टाळण्यासाठी हे स्वतःच नियम करत आहोत असे हे सांगत सुटले आहेत यामुळे या कार्यालयात हजारो अर्ज पडून आहेत सर्व सामान्य शेतकरी हा आपल्या शेतीच्या कागद पत्रासाठी दुर वरून माणगांव भुमिअभिलेख कार्यालयात चक्करा मारताना दिसत असून मनमानी व अजब कारभार करणाऱ्या या माणगांव भूमि अभिलेख कार्यलयातील अधिकारी व कर्मचारी याच्यावर जिल्हा वरिष्ठ अधिकारी यांनी कारवाई करावी असे सर्वसामान्य जनते मधून बोलले जात आहे.

# उपजिल्हा रुग्णालयात वॉर्डबॉयला मारहाण ; दोघांविरुध्द गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । माणगाव**

माणगांव तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालय येथे वॉर्डबॉय म्हणून काम करणाऱ्या जनार्दन देवजी पारावे यांना महाड येथील एका रुग्णाच्या नातेवाईकाकडून मारहाण केल्याची घटना घडली असून माणगांव पोलीस ठाणे येथे दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



माणगांव मध्ये संपूर्ण कोरोना कालावधीत येथिल सर्वच कर्मचारी, डॉक्टर, आरोग्य सेविका, सेवक, वार्डबॉय अहोरात्र रुग्णसेवेत आपले अमुल्य योगदान देत आले आहेत अशा प्रकारच्या घटनांमुळे आरोग्य व्यवस्थेवर त्याचे गंभीर पडसाद उमटले आहेत. त्यामुळे उपजिल्हा रुग्णालयात भितीदायक वातावरण निर्माण झाले आहे

सविस्तर माहीती अशी कि १३ जूलै रोजी रात्री १०.३० वा. च्या सुमारास फिर्यादी जनार्धन पारावे, डॉक्टर व स्टाफ सर्वजन हे रुग्णास येथुन हलविण्यासाठी वैद्यकीय सेवा पुरवीत असताना रुग्णालयात उपचाराकरीता दाखल असलेल्या रुग्ण यमुना लक्ष्मण पवार वय ५० वर्ष, रा. भावे पिंपळदरी ता. महाड यांचे नातेवाईक आरोपी निलेश पवार व त्यांचा सोबत असलेला अंदाजे २५ वयोगटातील एक इसम यांनी रुग्णवाहिकेमध्ये ऑक्सिजन सुविधा दिलेली असताना सुद्धा दुसरे दोन सिलेंडर टाका अशी मागणी केली. त्यावर फिर्यादी यांनी सिलेंडर पुरवून देखील .../२

# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे भुसंपादन रद्द करा ; शेतकऱ्यांचे लाक्षणिक उपोषण

## डोलवी औद्योगिक क्षेत्रासाठी भुसंपादनाला शेतकऱ्यांचा विरोध




**दै.रायगड नगरी । पेण**

औद्योगिक विकास महामंडळा मार्फत पेण तालुक्यातील डोळवी औद्योगिक विकास क्षेत्रासाठी काराव – गडब , डोलवी, वडखळ बोरी ग्रामपंचायत परिसरातील जमिन संपादित करण्यात येणार आहे या भुसंपादनाला येथील शेतक–यांनी विरोध दर्शविला असुन हे भुसंपादन रद्द करावे या मागणीसाठी या परिसरातील शेतक–यांनी पेण उपविभागिय कार्यालयासमोर एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण केले. यावेळी संजय पाटील, सुनिल कोठेकर, दिनेश म्हात्रे, सुशिल कोठेकर, प्रविण म्हात्रे. आदि शेतकरी उपोषणास बसले होते.

औद्योगिक विकास महामंडळामार्फत डोळवी औद्यौगिक विकास क्षेत्रासाठी पेण तालुक्यातील वावे, कोळवे, बेणेघाट, डोळवी, खारढोंबी, खारचिर्बी, खारकारावी, काराव, खारमांचेळा, खारजांभेळा, खारघाट या गावातील २१२० हेक्टर जमिन संपादित करण्यात येणार आहे या मध्ये १६५ हेक्टर सरकारी जमिन ,जेएसडब्लु कंपणीचे ४११ हेक्टर जमिन तर खाजगी शेतक–यांची १५३७ हेक्टर जमिन संपादित करण्यात येणार आहे. या भुसंपादना बाबत येथील शेतकऱ्यांना औद्यौगिक विकास १९६१चा कलम ३२( २ ) अन्वये व्यक्तिगत नोटीस शासनाने बजावल्या आहेत. सदर भुसंपादनाला शेतक–यांनी विरोध दर्शविला आहे. या भुसंपादनामुळे शेतक–यांचे उपजिविकेचे साधन नष्ट होणार आहे. गावाचा विस्तार करण्यासाठी जागाच शिल्लक राह–णार नाही. तर अनेकांची घरे देखील या भुसंपादनात बाधित होणार आहेत. अनेकांचे छोटे मोठे व्यवसाय या जागेत आसल्याने अनेकांचा रोजगार जाणार आहे त्यामुळे त्यामुळे या भुसंपादनाला शेतक–यांचा विरोध आहे. हे भुसंपादन रद्द करावे या मागणीसाठी लाक्षणिक उपोषण केले. या उपोषण स्थळी आमदार रवी पाटील, सामाजिक कार्यकर्ते .../२

# अवजड वाहतुकीमुळे खोपटा पुलाचा धोका वाढला ; भितीचे वातावरण

**दै.रायगड नगरी । उरण**




उरण पूर्व विभागातील जनतेला उरण तालुक्याच्या ठिकाणी प्रवाशी वाहतूकीसाठी लोड बेरिंगवर तयार करण्यात आलेल्या खोपटा येथील जुन्या पुलावरून अवजड वाहतुकीमुळे मागील २७ वर्षे पुलाच्या कोणत्याही प्रकारच्या दुरुस्तीचे काम झालेले नसल्यामुळे खोपटा येथील जुन्या पुलाला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे महाड दुर्घटना किंवा नुकताच झालेल्या काशीद पूल प्रमाणे दुर्घटनेची भीती प्रवाशांमध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळे या पुलावरून अवजड वाहतूक बंद करून त्वरित मेंटनेन्स करावि अशी मागणी जोर धरू लागली आहे.

उरण तालुक्याच्या ठिकाणी ये- जा करताना उरण पुर्व विभागातील जनतेचा पैसा,वेळ वाचून सुखद प्रवास करता यावा यासाठी राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री बॅं. ए.आर.अंतुले यांनी पुर्व विभागातील जनतेच्या सुखसोयीसाठी खोपटा खाडीकिनाऱ्यावर प्रवाशी वाहनांसाठी पुलाची उभारणी करण्यासाठी शासनाकडून मंजुरी घेऊन खोपटा पुलाची उभारणी केली.

कालांतराने जेएनपीटी बंदराच्या अनुषंगाने उरण पूर्व भागात गोदामे साकारण्यात येऊ लागली आणि अवजड वाहतूक या पुलावरून वाढू लागली. त्यामुळे दुसऱ्या पुलाची निर्मिती ही झाली आहे. मात्र प्रवाशी वाहनांच्या वर्दळीसाठी उभारण्यात आलेल्या जुन्या खोपटा पुलावरून सध्या रात्री अपरात्री मोठ्या प्रमाणात क्षमतेपेक्षा जास्त वजनाच्या अवजड वाहनांची मालाने भरलेल्या कंटेनर ट्रेलरची वर्दळ वाढल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.

अशा अवजड वाहनांच्या वर्दळीमूळे जुन्या खोपटा पुलाची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाली असून लोखंडी सळ्या उखडू लागल्या आहेत. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर पुलाच्या बेअरिंगच्या दुरुस्तीचे काम मागील अनेक वर्षांपासून हाती घेतले नाही. २०१७ मध्ये एका कंपनी मार्फत पुलाचा सर्व्हे करण्यात आला होता. त्या कंपनीने बेअरींग दुरुस्त करून नवीन टाकण्याचे अहवाल ही दिला होता,असे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिकारी वर्गाकडून सांगण्यात आले आहे. मात्र या संवेदनशील बाबीकडे सार्वजनिक बांधकाम विभाग कानाडोळा करत आहे.

मात्र ही अशीच अवजड वाहतूक सुरू राहिली तर पूलांच्या बेअरिंग सततच्या अवजड वाहनांच्या वर्दळीमूळे आणखीन निकामी होतील आणि काशीद अपघाताची पुनरावृत्ती होईल .त्यामूळे ही अवजड वाहतूक बंद करावी आणि पुलाच्या दुरुस्तीचे काम करावे अशी मागणी प्रवाशी जनतेतून होत आहे. तसेच तालुक्यातील रस्त्यांवर बांधलेले छोटे पुलंना ही ३५ ते ४० वर्षे होऊन गेली आहेत ते ही निकामी होऊ लागले आहेत त्यांची ही दुरुस्ती होणे गरजेचे आहे.त्याकडेही सार्वजनिक बांधकाम खाते दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत आहे.

# काशिद पुल तात्काळ करा आ.जयंत पाटील यांची मुख्यमंत्र्यांजवळ चर्चा

## शेकाप नेत्या चित्रलेखा पाटील यांनी केली पाहणी



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

मुरुड तालुक्यातील काशीद येथील पुल दुर्घटनेनंतर मंगळवारी शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी भेट देवून पाहणी केली.

शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आमदार भाई जयंत पाटील यांनी थेट मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण यांच्याशी मुरुडला जोडणाऱ्या काशिद पुलाची तातडीने दुरुस्ती करून सरसकट सर्वांना मदत झाली पाहिजे अशी फोनवर चर्चा होऊन पत्रव्यवहार सुद्धा केलेला आहे.

अलिबाग-मुरूड राजमार्गावरील काशिद येथील छोटा साकव पूल अतिवृष्टीत वाहून गेला. या दुर्घटनाग्रस्त भागाची चित्रलेखा पाटील यांच्या कडून पाहणी करण्यात आली.

नुकसानग्रस्तांना नुकसानभरपाई मिळालीच पाहिजे या साठी तलाठी, ग्रामसेवकांशी चर्चा केली. शेकापच्या वतीने जास्तीत जास्त नुकसानग्रस्तांना मदत करणार असल्याचे चित्रलेखा पाटील यांनी सांगितले.

# अबोली रिक्षा चालक महिलेला मारहाण प्रकरणी भाजप महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष चित्रा वाघ यांची वाशी हॉस्पिटलमध्ये भेट

**दै.रायगड नगरी । पनवेल**



अबोली रिक्षा चालक महिलेच्या मारहाण प्रकरणी आज भाजप महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष चित्रा वाघ यांनी वाशी येथील हॉस्पिटलमध्ये जावून त्यांची भेट घेतली. तसेच सत्य परिस्थिती जाणून घेतली.

मंगळवारी रात्री अबोली रिक्षाचालक संघटनेची सविता बेले या बेलापूर ते नेरूळ सेक्टर १० येथे प्रवाशाच्या जबरी मुळे ४ प्रवाशी घेऊन घेली असता मीटर प्रमाणे भाडे ७५ रुपये झाले असता अज्ञात प्रवाशाने तिच्याबरोबर हुज्रत घालून हिला मारहाण केली ती सध्या वाशी सेक्टर१० च्या नवी मुंबई महानगर पालिकेच्या हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असून सदर प्रकरणाची माहिती अबोली रिक्षाचालक संघटनेच्या अध्यक्ष संतोष भगत यांना मिळताच ते ताबडतोब मदतीला धाऊन गेले महिलेने प्रवाशां विरोधात पोलीस तक्रार नेरूळ च्या पोलीस ठाण्यात नोंद केली या महिलेवर झालेला मारहाणीत तिला न्याय मिळालाच पाहिजे अशी अबोली रिक्षा चालक महिला संघटनेची मागणी आहे. सदर घटना भाजप महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष चित्रा वाघ यांना समजता त्यांनी आज गुरुवार दि१५ जुलै रोजी दुपारी१२:३० च्या दरम्यान वाशी सेक्टर १० च्या नवी मुंबई महानगर पालिकेच्या हॉस्पिटलमध्ये भेट घेतली असता वैद्यकीय अधिकारी प्रशांत जवादे यांच्याशी चर्चा केली असता असे समजले की तिची प्रकृती स्थिर आहे तिची कोरोना टेस्ट केली असता पॉझिटीव्ह आली असल्यामुळे तिला कोरोना सेंटरला हलवण्यात येणार आहे अशी माहिती मिळाली. चित्रा वाघ यांनी पोलीस अधिकाऱ्यांना या बाबत फोन करून विचारले असता यातील ३ आरोपी ताब्यात घेतले असून १ लवकरच ताब्यात घेऊ असे त्यांना सांगितले. यावर बोलताना चित्रा वाघ म्हणाल्या अबोली महिलांच्या पाठीशी मी नेहमी असेन या महिलेस न्यास नक्की मिळून देऊ, या पुढे असे कोणा महिलेवर मारहाण होऊ नये यासाठी प्रयत्न करेन तसेच आरोपीला शिक्षा देऊन तिला न्याय मिळवून देऊ. या वेळी माजी खासदार संजीव नाईक सुद्धा उपस्थित होते त्यांनी ही या महिलेला न्याय देण्यासाठी आम्ही अबोली रिक्षा महिलांना बरोबर आहे असे सांगितले सर्व अबोली महिलांनी चित्रा वाघ, संजीव नाईक, अध्यक्ष संतोष भगतचे आभार मानले.

# जिल्हाधिकारी यांच्या हस्ते आदिवासी कुटुंबांना खावटी अनुदान वाटप संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

करोना महामारीमुळे अनेकांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिलेले आहे. या परिस्थितीत डोंगर दऱ्याखोऱ्यात राहणारा आदिवासी समाज रोजगारा-पासून वंचित राहिला आहे. त्यामुळे शासनाकडून या आदिवासी बांधवांसाठी खावटी अनुदान वाटप योजना विशेष योजना म्हणून सन २०२०-२१ या वर्षात मंजूर केली आहे.

खावटी योजनेंतर्गत अनुसूचित जमातीच्या कुटुंबियांना रु.४ हजार प्रति कुटुंब अनुदान ज्यामध्ये रुपये २ हजार किंमतीचे वस्तू स्वरुपात वाटप व रुपये २ हजार इतकी रक्कम त्यांच्या बँक / डाक खात्यामध्ये वितरित करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. या पार्श्वभूमीवर आज डी.के.पी. केळकर विद्यालय, अलिबाग येथे आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी श्रीम. निधी चौधरी यांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरुपात अलिबाग, मुरुड व रोहा तालुक्यातील प्रत्येकी दहा आदिवासी कुटुंबांना खावटी अनुदान वाटप करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी आदिवासी बांधवांनी विविध शासकीय योजनांचा लाभ घ्यावा तसेच लसीकरण करुन घेण्यासाठी पुढे यावे, असे आवाहनही केले. रायगड जिल्ह्यात या योजनेंतर्गत एकूण लाभार्थी संख्या ४८ हजार ५६५ असून रुपये २ हजार लाभ मिळालेल्या लाभार्थींची संख्या ३९ हजार ९३१ आहे तर जिल्ह्यासाठी एकूण ४० हजार ३२३ किट प्राप्त झाले आहेत, अशी माहिती एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी श्रीम. शशिकला अहिरराव यांनी दिली आहे. यावेळी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी श्रीम. शशिकला अहिरराव, जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके, श्री. कृष्णा लक्ष्मण म्हात्रे, श्री.मनमित पाटील, कातकरी संघटना अलिबाग अध्यक्ष श्री. भगवान नाईक, गौरव पाटील, उप प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ, जव्हार श्री. राजेश पवार, सहायक प्रकल्प अधिकारी श्री. कैलास खेडकर, कार्यालय अधीक्षक आनंद पाटील, इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे : नांदगांव, ता.पनवेल, जि.रायगड येथील १) जितेंद्र दत्तात्रेय हुद्दार आणि २) नरेश दत्तात्रेय हुद्दार यांचे नावे असलेल्या ताबे कब्जातील तसेच मालकी हक्काच्या खालील वर्णनाच्या मिळकती आमच्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदीखताने खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे : नांदगांव, ता.पनवेल, जि.रायगड**

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र चौ.मी. | आकार रु.पै. | मालकाचे नांव |
|---|---|---|---|
| ८/२/३/४/अ/३ | क्षेत्र ०-०६-२० पो.ख. ०-००-७० एकूण क्षेत्र ०-०६-९० | १.०३ | १) जितेंद्र दत्तात्रेय हुद्दार २) नरेश दत्तात्रेय हुद्दार |
| उपरोक्त वर्णन केलेली मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय आहे. | | | |

वरील वर्णन केलेल्या मिळकतींचे क्षेत्र हे निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत वर नमूद मिळकत मालकांचे म्हणणे आहे.

तरी सदर मिळकतींवर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, मृत्यूपत्र, विक्रीचा करार, साठेकरार, पोटगी चार्ज, ताबा, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत तक्रार मुदतीत आमच्याकडे न आल्यास मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, कळावे.

पनवेल
दि.१५/०७/२०२१

सही/-
अॅड.राजीव गुप्ता
ऑफिस नं.७, कनक सरोवर,
ठाणा नाका रोड, पनवेल, जि.रायगड
मोबा नं.७९७७८९९२९०/७३०३१६१३३७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे : वाघाची वाडी, ता.पनवेल, जि.रायगड येथील १) यशवंत सखाराम नरवणकर, २) सतीश यशवंत नरवणकर, ३) सुरेश यशवंत नरवणकर, ४) सरिता रवींद्र रसाळ, ५) सुचरिता रवींद्र रसाळ यांचे नावे असलेल्या ताबे कब्जातील तसेच मालकी हक्काच्या खालील वर्णनाच्या मिळकती आमच्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदीखताने खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे : वाघाची वाडी, ता.पनवेल, जि.रायगड**

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र चौ.मी. | आकार रु.पै. | मालकाचे नांव |
|---|---|---|---|
| ८/३/४५ | २२-३० | २२३.०० | १) यशवंत सखाराम नरवणकर २) सतीश यशवंत नरवणकर ३) सुरेश यशवंत नरवणकर ४) सरिता रवींद्र रसाळ ५) सुचरिता रवींद्र रसाळ |
| उपरोक्त वर्णन केलेली मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय आहे. | | | |

वरील वर्णन केलेल्या मिळकतींचे क्षेत्र हे निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत वर नमूद मिळकत मालकांचे म्हणणे आहे.

तरी सदर मिळकतींवर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, मृत्यूपत्र, विक्रीचा करार, साठेकरार, पोटगी चार्ज, ताबा, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत तक्रार मुदतीत आमच्याकडे न आल्यास मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, कळावे.

पनवेल
दि.१५/०७/२०२१

सही/-
अॅड.राजीव गुप्ता
ऑफिस नं.७, कनक सरोवर,
ठाणा नाका रोड, पनवेल, जि.रायगड
मोबा नं.७९७७८९९२९०/७३०३१६१३३७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे : वाघाची वाडी, ता.पनवेल, जि.रायगड येथील मे.हिंगलाज इंटरप्रायझेस तर्फे प्रोप्रायटर अंबावी रणछोड पटेल यांचे नावे असलेल्या ताबे कब्जातील तसेच मालकी हक्काच्या खालील वर्णनाच्या मिळकती आमच्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदीखताने खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे : वाघाची वाडी, ता.पनवेल, जि.रायगड**

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र चौ.मी. | आकार रु.पै. | मालकाचे नांव |
|---|---|---|---|
| ८/३/५८ | ११-०० | ११०.०० | मे.हिंगलाज एंटरप्रायझेस तर्फे प्रोप्रायटर अंबावी रणछोड पटेल |
| उपरोक्त वर्णन केलेली मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय आहे. | | | |

वरील वर्णन केलेल्या मिळकतींचे क्षेत्र हे निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत वर नमूद मिळकत मालकांचे म्हणणे आहे.

तरी सदर मिळकतींवर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, मृत्यूपत्र, विक्रीचा करार, साठेकरार, पोटगी चार्ज, ताबा, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत तक्रार मुदतीत आमच्याकडे न आल्यास मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, कळावे.

पनवेल
दि.१५/०७/२०२१

सही/-
अॅड.राजीव गुप्ता
ऑफिस नं.७, कनक सरोवर,
ठाणा नाका रोड, पनवेल, जि.रायगड
मोबा नं.७९७७८९९२९०/७३०३१६१३३७

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल सौ.निशा अनिल भगत रा.आसुडगाव, ता.पनवेल, जि.रायगड, पिन नं.४१०२१८ यांनी खालील नमूद केलेली मिळकत / शॉप विकत घेण्याचे ठरविलेले असून, त्याबाबत त्यांनी सदरील शॉपचे मालक साई डेव्हलपर्स प्रोप्रायटर श्री.दशरथ बाळु म्हात्रे यांना संपूर्ण रक्कम अदा केलेली आहे. सदरील शॉपचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**साई पुजा को.ऑप.हौसिंग सोसायटी**
**शॉप नं.०४, तळमजला,**
**७८.३३ चौ.फूट (कारपेट एरिया)**
**ग्रामपंचायत घर नंबर ३९,**
**आसुडगाव, पनवेल,**
**ता.पनवेल, जि.रायगड, पिन ४१०२१८**

सदरच्या वर नमूद शॉप बाबत आमचे अशिल व सदरील गाळ्याचे मालक साई डेव्हलपर्स प्रोप्रायटर श्री.दशरथ बाळु म्हात्रे, रा.आसुडगाव, ता.पनवेल, जि.रायगड. पिन ४१०२१८ यांचेमध्ये सदरील वर नमूद शॉपचे खरेदीचा व्यवहाराबाबत बोलणी झाली असून, सदरील शॉपचे विक्रीबाबत आमचे अशिलांनी सदरील शॉपचे मालकांना संपूर्ण रक्कम दिलेली आहे व लवकरच आमचे अशिल व सदरील शॉपचे मालक यांच्यामध्ये सदरील शॉपचे विक्रीबाबत नोंदणीकृत करार करण्यात येणार आहे.

तरी वर नमूद शॉप / गाळा मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, बयाणा, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, हक्कसोडपत्र, चार्ज, अटॅचमेंट, लीन, लीज, अन्नवस्त्र, पोटगी, अदलाबदल, हवा, उजेड, जाणे येणेचा मार्ग, मृत्यूपत्र, मुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ (सात) दिवसाच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल वर नमूद मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकरच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

दि.१५/०७/२०२१

सही/-
अॅड.छाया रामदास म्हात्रे
बी.ए.एल.एल.बी.
दत्तछाया अपार्टमेंट, पायोनिअर सोसायटी,
ग्राऊंड फ्लोअर, युविका हॉटेल समोर,
स्वामी नित्यानंद रोड, ठाणा नाका, पनवेल

## ग्रामपंचायत गोवठणे
### मु.गोवठणे, पो.आवरे, ता.उरण, जि.रायगड
### जाहीर निविदा सन २०२१/२०२२

प्रति,
अधिकृत/अनुभवी ठेकेदार

यांस कळविण्यात येते की, ग्रामपंचायत गोवठणे हद्दीतील १५ व्या वित्त आयोगांतर्गत खालील विकासकामे करावयाची आहेत. त्याकरिता ग्रामपंचायत हद्दीतील/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळविण्याकरिता अर्जाची तारीख दि.१६/०७/२०२१ ते २२/०७/२०२१ पर्यंत या दिवशी (सुट्टीचे दिवस वगळून) कार्यालयीन वेळेत मिळतील.

सदर निविदा दि.२२/०७/२०२१ रोजी दुपारी ११.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील आणि सदर निविदा याच दिवशी कार्यालयीन वेळेत दि.१२.३० वाजता उघडण्यात येतील. कामाकरिता लागणारी इसारा रक्कम ग्रामपंचायत गोठवणेच्या नावाने डिमांड ड्राफ्ट/रोखीने स्वीकारण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे, अगर नाकारणेचा संपूर्ण अधिकार ग्रामपंचायत गोठवणे यांनी राखून ठेवला आहे. इसारा रक्कम प्रथम/अंतिम देयकांमधून परस्पर कापून घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | कामांची नावे | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम १% | सुरक्षा अनामत ५% | निविदा किंमत | निविदा पाठविणेची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रामेश्वर म्हात्रे यांचे घर ते स्मशान भूमीपर्यंत पाण्याची पाईपलाईन टाकणे | १,२६,०००.०० | १२६०.०० | ६३००.०० | १००.०० | दि.२२/०७/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत |
| २ | धनाजी वर्तक ते राजेंद्र आत्माराम म्हात्रे यांचे घरापर्यंत पाण्याची पाईप लाईन टाकणे | १,८४,३७४.०० | १८४४.०० | ९२२०.०० | १००.०० | |

शासनाच्या निकषांप्रमाणे अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-

अटी व शर्ती :-

१) सर्वात कमी दराचे अथवा कोणतेही टेंडर मंजूर अगर नामंजूर करण्याचा आधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे, त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

२) सदर काम पंचायत समितीकडील बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणेचे आहे. त्याचे मुल्यांकनाप्रमाणे बिल अदा करण्यात येईल.

३) काम ज्याच्या नावे मंजूर होईल त्यांनी नियमा प्रमाणे रुपये २०० स्टॅम्प पेपरवर बॉण्ड करून देणे

४) कामाचे ईस्टीमेट ऑफिस वेळेत पहावयास मिळेल.

५) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास बिल अदा करणे अगर न करणे याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

सही/-
ग्रामसेवक
श्री.प्रमोद मधुकर मुकुंदे
ग्रामपंचायत गोवठणे
ता.उरण, जि.रायगड

सही/-
सरपंच
सौ.प्रणिता प्रदीप म्हात्रे
ग्रामपंचायत गोवठणे
ता.उरण, जि.रायगड


पृष्ठ क्र.१ वरुन...

## उपजिल्हा रुग्णालयात वॉर्डबॉयला मारहाण ; दोघांविरुध्द गुन्हा दाखल

फिर्यादी यांना डाव्या कानाखाली मारुन दुखापत करून शिवीगाळ व दमदाटी करून जीवे ठार मारण्याची धमकी दिली. तसेच सरकारी कामात अडथळा निर्माण केला. याबाबत माणगांव पोलीस ठाणे येथे कॉ. गु. र. नं. १७१/२०२१ भा. दं. वि. क. ३५३, ३३२, ४२७, ५०४, ५०६, ३४, महा. वैद्य. सेवा व्यापती वैद्यकीय सेवा संख्या हिंसक कृत्य व मालमतेची नुकसान प्रति. अधि. सन २०१० चे कलम ४ प्रमाणे पो. हवालदार /९०६ वडते यांनी गुन्हा दाखल केला असून वरिष्ठ पो. नि. अश्वनाथ खेडकर यांच्या मार्गदर्शनात पुढील अधिक तपास स. पो. नि. कावळे हे करीत आहेत.

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे भुसंपादन रद्द करा

अरुण शिवकर, शिवसेनेचे माजी जिल्हा प्रमुख विष्णु पाटील, जिल्हा परिषद सदस्य प्रभाकर म्हात्रे, पंचायत समिती सदस्य प्रदिप म्हात्रे, नरेश गांवड, माजी जिल्हापरिषद सदस्य सुरेश म्हात्रे, संजय जांभळे, मनसेचे पेण तालुका अध्यक्ष अंकुश म्हात्रे, काराव- गडब सरपंच अर्पणा कोठेकर वडखळ सरपंच राजेश मोकल, सामाजिक कार्यकर्ते अनिल म्हात्रे, सचिन तांबोळी, परशुराम म्हात्रे आदिनी पांठीबा दिला.

तर या वेळी प्रकल्पग्रस्त शेतकरी व उपविभागिय अधिकारी विठ्ठल ईनामदार यांच्या सोबत कार्यालयात बैठक झाली या बैठकीत शेतक-यानी जमीनीची मोजणी करु नये व हा प्रकल्प रद्द करावा अशी मागणी केली असता या क्षेत्रातील सरककारी जमिन व जेएसडब्लु कंपणीच्या जमिनीची मोजणी केली जाईल शेतक-याच्या जमिनिची मोजणी तृर्त स्थगित करण्यात येईल असे उपविभागिय अधिकारी विठ्ठल ईनामदार यांनी सांगितले. यावेळी आमदार रवि पाटील, तहसिलदार अरुणा जाधव आदि सह शेतक-यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## म्हसळ्यात १५ जुलै राष्ट्रीय विरोध दिन पाळून कर्मचारी विरोधी धोरणांचा व्यक्त केला निषेध

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

आखिल भारतीय सरकारी कर्मचारी संघातर्फे देशातील २९ राज्यांमध्ये ८० लाख कर्मचाऱ्यांनी आज १५ जुलै रोजी राष्ट्रीय विरोधी दिन पाळून सरकारच्या कर्मचारी विरोधी धोरणांचा निषेध व्यक्त करून काळ्या फिती लावून काम केले.संघटनेतर्फे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निवेदन पोचावे त्यासाठी तहसीलदार शरद गोसावी यांच्याकडे निवेदन देण्यात आले.

या प्रसंगी संघटनेचे तालुका अध्यक्ष जितेंद्र टेम्भे, सरचिटणीस भीमराव सूर्यटतल, मंडळ अधिकारी एस. के. शहा, परिमंडळ वनाधिकारी बाळकृष्ण गोरनाक, पाडावे, कोसबे अण्णा, रणदिवे, चव्हाण आदि मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना परिमंडळ वनाधिकारी बाळकृष्ण गोरनाक यांनी सांगितले कि गेले कित्येक वर्षे शासनाने सरकारी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले असून शासन कर्मचाऱ्यांच्या मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष करीत आहे.

त्यामध्ये प्रामुख्याने शासकीय सेवेतील रिक्त असलेली लाखो पदे भरणे, कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना देय असलेले अनुद्येय आर्थिक लाभ लागू करणे, अनुकंपा तत्वावरील नोकऱ्या देणे, सर्व कर्मचाऱ्यांना मोफत लस तसेच दीर्घकाळ असणाऱ्या प्रलंबित मागण्या मान्य करणे अश्या अनेक मागण्या लवकरात लवकर मंजूर कराव्यात अशी मागणी निवेदनद्वारे करण्यात आल्याचे बाळकृष्ण गोरनाक यांनी सांगितले.

## उरण तालुक्यात कोरोना लसीकरणाचा वेग वाढला

**दै.रायगड नगरी । उरण**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर कोरोनाच्या पहिल्या आणि दुसर्या० लाटेला परतवीण्यासाठी सरकार तर्फे युद्धपातळीवर उपाययोजनां करण्यात येत आहेत.उरणमध्येही तालुका आरोग्य विभागाने कोरोना लसीकरणासाठी नागरिकांना आव–हन करण्यात आले होते.तसेच उरणमध्ये ग्रामीण आरोग्य केंद्र कोप्रोली , इंदिरागांधी ग्रामीण रुग्णालय उरण, नगरपरिषद शाळा उरण, जेएनपीटी हॉस्पिटल, आरोग्य उपकेंद्र, चिरनेर, विंधणे, जासई या लसीकरण केंद्रा व्यतिरिक्त काही ग्रामपंचायती, आस्थापने, स्वयंसेवी संस्थां लसीकरणासाठी पुढे येत असल्याने उरणमध्ये कोरोना लसीकरणाचा वेग वाढला आहे. उरण मध्ये लसीकरण सुरु झाल्यापासून लसीच्या उपल्बाध्ते नुसार लसीकरण केंद्रावर पहिला आणि दुसरा डोस देण्याची प्रक्रिया निरंतर सुरू आहे. प्रशासनाच्या प्रयत्नामुळे आत्तापर्यंत २५६४१ नागरिकांना कोविशिल्ड चे तर ६०८८ नागरिकांना कोव्याक्सींनचे डोस मिळून उरण तालुक्यात एकूण ३१७२९ नागरिकांना कोरोना लास देण्यात आली आहे. त्यापैकी, एकूण २४४२६ नागरीकाना पहिला डोस देण्यात आला आहे. तर ७३०३ नागरीकाना दुसरा डोस देण्यात आला आहे.तर १७१२३ नागारीक लसीच्या दुस्र्सया डोस साठी प्रलंबित आहेत. यामध्ये १८ ते ४४ वयोगटातील ४५९८ नागरिक ४५ ते ६० वयोगटातील ८४५३ व ६० वर्षावरील ५२६१ नागरिकांना लास देण्यात आली आहे. त्याचबरोबर ४५२८ फ्रन्टलाइन वर्कर व १५८६ हेल्थकेअर वर्कर यांनी देखील लसीचा डोस घेतला आहे.

# श्रीवर्धन तालुक्यात शनिवार व रविवारी होणारे वीकेंड लॉकडाऊन रद्द करण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन तालुक्यात शनिवारी व रविवारी या वीकेण्डच्या दिवशी करण्यात येणारे लॉकडाऊन या आठवड्यापासून रद्द करण्यात यावे अशी आग्रही मागणी श्रीवर्धन तालुक्यातील पर्यटन व्यावसायिकांकडून व नागरिकांकडून करण्यात येत आहे. मागील चार महिन्यांपासून पर्यटन व्यवसाय बंद आहे. पर्यटन व्यवसायिक पुरते आर्थिक हतबल झाले आहेत. अन्य ठिकाणांहून कोणताही कमाईचा मार्ग नाही. तसेच पर्यटन व्यवसाया वरती अवलंबून असणारे घटक देखील उपासमारीचे छायेतून जात आहेत. श्रीवर्धन तालुक्यात पर्यटक शनिवारी व रविवारी जास्त प्रमाणात येतात. शनिवार व रविवार हा सुट्टीचा दिवस असल्यामुळे मोठ्या शहरांमधून जसे मुंबई, पुणे, ठाणे, कल्याण, डोंबिवली या ठिकाणचे पर्यटक श्रीवर्धन समुद्रकिनारी भेट देण्यासाठी शनिवारी व रविवारी आवर्जून येत असतात. याआगोदर श्रीवर्धन बाजारपेठ सकाळी सात ते दुपारी चार वाजेपर्यंत सुरू असायची, परंतु कोणत्याही प्रकारचा विकेंड लॉकडाऊन या ठिकाणी करण्यात येत नव्हता. मात्र पर्यटन व्यवसाय सुरु होतोय हे पाहिल्यानंतर प्रशासनाने वीकेण्ड लॉकडाउन जाहीर केला. जेणेकरून पर्यटन व्यवसायिक यांचे मोठ्या प्रमाणावरती नुकसान झाले. श्रीवर्धन तालुक्यातील कोरोना पॉझिटिव्हिटी रेट खूप मोठ्या प्रमाणात कमी आला आहे. कोरोना बाधित बरे होण्याची संख्याही समाधान कारक आहे. अशा स्थितीत विनाकरण विकेंड लॉकडाउन लावणे हा श्रीवर्धन तालुक्यातील नागरिकांवर अन्याय करण्याचाच प्रकार आहे. पर्यटक या ठिकाणी आल्यानंतर बाजारपेठ बंद पाहून त्यांचा ही भ्रमनिरास होतो.रविवार पासुन तालुक्यात पावसाची संततधार सुरु असल्याने पूर्ण आठवडा मंदी मध्ये गेला आहे. तालुक्यातील हरिहरेश्वर, दिवेआगर या ठिकाणची मंदिरे देखील आता काही क्षमतेने सुरू करण्याची आवश्यकता आहे. कारण पुढील महिन्यात हिंदू धर्मीयांचा पवित्र श्रावण महिना सुरु होत आहे. श्रावण महिन्यात अनेक भाविक व पर्यटक हरिहरेश्वर या दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेल्या तीर्थक्षेत्राला दर्शन घेण्यासाठी येत असतात. महाराष्ट्रातील अनेक कुटुंबियांचे हरिहरेश्वर हे कुलदैवत असून त्याठिकाणी वार्षिक पूजाअर्चा करण्यासाठी देखील भाविक मोठ्या प्रमाणात येत असतात. तरी प्रशासनाने श्रीवर्धन तालुक्यातील मंदिरे काही क्षमतेने सुरू करण्याची मागणी नागरिकांमधून केली जात आहे. श्रीवर्धन तालुक्यात आत्तापर्यंत सोळाशे बारा कोरोना रुग्ण आढळून आले पैकी चौदाशे एकोणतीस रुग्ण पूर्णपणे बरे होऊन आपापल्या घरी परतले असून, ८२ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. तर एकशे एक रुग्ण अद्याप उपचार घेत आहेत. काल प्राप्त झालेल्या कोरोना अहवालानुसार श्रीवर्धन तालुक्यात नवीन आठ कोरोना बाधित रुग्ण आढळून आले. तर अकरा रुग्णांनी कोरोना वरती यशस्वीपणे मात केली. दोन रुग्ण मयत झालेले आहेत. तर उपचार घेत असलेल्या १०१ रुग्णांपैकी जिल्हा सामान्य रुग्णालयात दोन रुग्ण उपचार घेत आहेत. श्रीवर्धनच्या उपजिल्हा रुग्णालयांमध्ये २१ रुग्ण उपचार घेत असून,आराठी येथील कोविड केअर सेंटरमध्ये दोन रुग्ण उपचार घेत आहेत. तर एक रुग्ण खाजगी इस्पितळात उपचार घेत आहे. ७५ रुग्ण आपल्या घरीच विलगीकरणामध्ये उपचार घेत आहेत. रुग्ण संख्या मोठ्या प्रमाणावर घटल्यामुळे प्रशासनाने वीकेंड लॉकडाऊन रद्द करावा अशी मागणी आता व्यापारी, नागरिक व पर्यटन व्यावसायिकां मधून केली जात आहे.

# उरणमध्ये बेशिस्त वाहन चालकांवर वाहतूक पोलिसांची दंडात्मक कारवाई

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण वाहतुक शाखेने नियम मोडणाऱ्या बेशिस्त वाहन चालकांवर पंधरा दिवसात २१४७ जणांवर दंडात्मक कारवाई केली असल्याची माहिती वाहतुक शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक माणिक नलावडे यांनी दिली आहे. रस्त्यावर आजपर्यत अनेक अपघात हे नियम मोडणाऱ्या बेशिस्त वाहन चालकांमुळे झाले आहेत.

त्यामध्ये अनेकांनी आपला जीव ही गमावला आहे. तरीही दारू पिऊन भर धाव वेगाने वाहने चालविणे मोटार सायकल कट मारून चालविणे अशा अनेक कारणांमुळे अपघात होतात अशा अपघातांना आला बसण्यासाठी वाहतूक शाखेकडून अनेक वेळा समजविले जाते आव्हानही केले जाते मात्र पुन्हा पुन्हा चूका होत असतात. त्यामुळे पोलिसांना कारवाई करणे भाग पडत आहे.

१ जुलै ते १४ जुलै दरम्यान उरण वाहतूक शाखेकडून उरण शहरात आणि संपूर्ण तालुक्यात एकूण २१४७ जणांवर दंडात्मक कारवाया करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये मोटारसायकल, मोटार वाहन चालकांनवर तसेच रस्त्यावरच दोन्ही बाजूला वाहने पार्कींग करून ठेवत असलेल्या, हेल्मेट नसणे,विना लायसन्स ट्रिपल सीट, नंबर प्लेट अशा एकूण १०१७ वाहनांवर कारवाई केली आहे.

सीटबेल्ट विना लायसन्स, नोपार्किंग अन्य कारणांनी चार चाकी सहा चाकी, आणि अवजड १०३५ वाहनावर कारवाई करण्यात आली आहे. तसेच ओव्हर शीट लायसन्स अशा अन्य कारणांनी ९५ रिक्षांवर कारवाई करण्यात आली आहे. आशा एकूण २१४७ वाहनांवर विविध कलमन्वे कारवाई करण्यात आली असल्याची माहिती वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक माणिक नलावडे यांनी दिली आहे.

## बेवारस मृतदेह सापडला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये आर ए कॅम्प समोरील रोडवर मेट्रो बीच खाली पापडीचा पाडा येथे एका बेवारस इसमाचे प्रेत सापडून आले आहे. खारघर पोलीस या इसमाच्या नातेवाइकांचा शोध घेत आहेत. या इसमाचे अंदाजे वय ४५ असून त्याचा नाव पत्ता माहीती नाही.

त्याची उंची साडेपाच फूट, नाक बस्के, केस कुरळे वाढलेले आहेत. त्याचा बांधा सडपातळ असून अंगात लाल रंगाचा टीशर्ट आणि काळ्या रंगाचे ट्रॅक पॅन्ट परिधान केलेले आहे. त्याच्या उजव्या हाताच्या मनगटावर कनम असे गोंदलेले आहे. या मृत्यू ईसमाबाबत अधिक माहिती असल्यास खारघर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हरीश काळसेकर यांच्याशी संपर्क साधावा.

## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

## TENDER NOTICE

Re-development of **GURUKUL CO OP HOUSING SOCIETY LTD**

Registration No.RGD/PWL/HSG/(TC)/1086/1993-94

standing on Plot No.124/2, R S Khare Marg, Opp New District Court, Lokhandi Pada Panvel 410206, having Plot Area about 406 Sq. Mtr.

Tender will be

available in between 11 AM to 1.30 PM & 4.00 PM to 6.00 PM at the Resident of Secretary MR.R.P.ZOPE, Flat No.102 of Gurukul Co Op Hsg Society Ltd on Payment of Rs.2500/- by Cheque which is non Refundable till 24/07/2021

Offers are invited in sealed envelope from Reputed Builder / Developers on or before 24/07/2021 till 6 PM.

Date : 15/07/2021

**HON CHAIRMAN / HON SECRETARY**
**Gurukul Co-op. Hsg. Soc. Ltd., Panvel**
**Mob No.8779135856**
**9867640472**

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड–अलिबाग, यांचे कार्यालय**
**शुक्रतारा बिल्डींग, तळमजला, सतकार प्रेस समोर, पो.ता.अलिबाग, जि.रायगड**
**दूरध्वनी क्रमांक ०२१४१–२२२०१३ ई–मेल** ddr_rgd@rediffmail.com

**(महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री व्यवस्थापन हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ याच्या कलम ११ पोटकलम (३) अन्वये अर्जदाराच्या नावे एकतर्फी मानवी हस्तांतरण)**

**महालक्ष्मीनगर (निलकमल) सहकारी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या.**
**नेरे गाव विभाग ३, ता.पनवेल, जि.रायगड**
**मालमत्तेचे मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयंसबाबत) जाहीर नोटीस**

महालक्ष्मीनगर डेव्हलपर्स तर्फे १/१, श्री.अनिश मेहता, कार्या. पत्ता ११२, मेकर चेंबर, ३२२३ नरिमन पॉईंट, मुंबई. यांना जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे कार्यालयात महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियम ११ अन्वये खालील मालमत्तेचे मानिव अभिहस्तांतरण करून मिळणेबाबत अर्ज केला आहे. सर्व संबंधितांना आपले म्हणणे सादर करणेसाठी संधी मिळावी म्हणून दि.२७/०७/२०२१ रोजी स.११.५० वाजता अंतिम सुनावणी निश्चित केली आहे.

**मालमत्तेचे वर्णन**
**सर्व्हे नं.२४३/२, (नवीन सर्व्हे नं.९७/२) क्षेत्र ३६२० चौ.मीटर,**
**मौजे : नेरे, ता.पनवेल, जि.रायगड**

वरील मिळकतीबाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावित कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दि.२७/०७/२०२१ पूर्वी या कार्यालयात दाखल करावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस हजर रहावे. अन्यथा कोणाचीही काहीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.१४/०७/२०२१

**सही/–**
**(गोपाळ मावळे)**
**सक्षम प्राधिकारी,**
**तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था रायगड–अलिबाग**

---

अर्जदाराचे वकील : ॲड.अनिल सुभाष जाधव

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज नं.४५९/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१७/०८/२१

श्री.मोहम्मद फारुक नबी रसूल इंडी
वय : ६० वर्षे, धंदा : व्यापार
रा.पटेल मोहल्ला, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते आहे की, श्री.मोहमद फारुक नबी रसूल इंडी यांची आई पै.हाफिजा नबी रसूल इंडी ही दि.११/०७/१९९७ रोजी मौजे : पटेल मोहल्ला, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी मरण पावली आहे. सदरहू अर्जदार यांनी पै.हाफिजा नबी रसूल इंडी यांच्या मृत्यूच्या तारखेची नोंद होणेकरिता अर्जदार यांनी सदरचा अर्ज नामदार कोर्टात दाखल केलेला आहे.

सदरहू पै.हाफिजा नबी रसूल इंडी वर नमूद ठिकाणी मयत झाले आहेत किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर किंवा सदर अर्जदारांनी दाखल केलेल्या अर्जाबाबत कोणत्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत मे.कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व सदरहू न्यायालय अर्जदार यांचेकडे सदरहू पै.हाफिजा नबी रसूल इंडी यांची मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दि.१५/०७/२०२१ रोजी दिली.

**सही/– क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/– सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल**

---

राव साहेब
ॲड.प्रणित ए. धनावडे
अर्जदार तर्फे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.८०९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.३०/०८/२१

१) श्रीमती.सुरेखा जगन्नाथ घाडगे
रा.ए–विंग, ३०३, न्यू कंन्सेपट
रेसिडेन्सी, प्लॉट नं.२५ सी, से.नं.७,
एम एन शाळेसमोर, खारघर,
रायगड, महाराष्ट्र–४१०२१०
२) श्री.रणजित जगन्नाथ घाडगे
रा.१४३/ए ४८४१, नेहरु नगर,
एस.जी.बर्वे मार्ग रोड, मदर
डेअरी रोड जवळ, कुर्ला पु.,
मुंबई, महाराष्ट्र–४०००७०
३) कु.अनिता जगन्नाथ घाडगे
रा.१४३/ए ४८४१, नेहरु नगर,
पोलीस वसाहत, एस.जी.बर्वे मार्ग,
नेहरु नगर, कुर्ला पु.मुंबई
मुंबई उपनगर, महाराष्ट्र–४०००२४
४) श्री.अजित जगन्नाथ घाडगे
रा.ए–३०३, न्यू कंन्सेपट
रेसिडेन्सी, प्लॉट नं.२५ सी,
से.नं.७, कामोठे, कळंबोली नोड,
रायगड, महाराष्ट्र–४१०२१८ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

१) या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ ही कै.जगन्नाथ भुजंगराव घाडगे यांची पत्नी असून अर्जदार क्र.२ व ४ हे मुलगे आहेत व अर्जदार क्र.३ ही मुलगी अहे.

२) कै.जगन्नाथ भुजंगराव घाडगे हे दि.०६/१०/२०१९ रोजी मौजे : किंग एडवर्ड मेमोरिअल हॉस्पिटल ॲण्ड मेडीकल कॉलेज, मुंबई, महाराष्ट्र येथे मयत झालेले असून कै.जगन्नाथ भुजंगराव घाडगे यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहेत. तसेच अर्जदारां व्यतिरिक्त कै.जगन्नाथ भुजंगराव घाडगे यांस आणखीन कोणीही वारसदार नव्हते व नाहीत.

३) कै.जगन्नाथ भुजंगराव घाडगे यांची पनवेल शहर महानगरपालिका, ता.पनवेल, जि.रायगड येथील खुद्द मालकीची व नावे असलेली प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णनाचा फ्लॅट होता व आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**अ) ए–विंग, फ्लॅट नं.३०३, ३ रा मजला, (बिल्टअप एरिया ४०८ (३७.९१ चौ.मीटर)), न्यू कंन्सेप्ट रेसिडेन्सी, प्लॉट नं.२५ सी, सेक्टर नं.७, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**

४) कै.जगन्नाथ भुजंगराव घाडगे यांची वर कलम ३ अ मधील नमूद खुद्द मालकीची व नावे असलेली प्रत्यक्ष ताबेकब्जातील मिळकतीतील आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांनी तसा वारस दाखला मिळण्याकरिता दिवाणी चौकशी अर्ज क्र.८०९/२०२१ पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत अर्जदार हे कै.जगन्नाथ भुजंगराव घाडगे यांचे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात हजर राहून लेखी हरकत स्वतः अगर वकीलांमार्फत सादर करावी.

वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे लाभांत अर्जदारांच्या नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

आज तारीख १४/०७/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.गोडसे मॅडम
वकील : ए.के.साहू

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.६८६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.३०/०८/२१

श्री.बेंनसेली ग्नानाप्रकाशम
हसबंड ऑफ मयत एजनीस बेंनसेली
तर्फे कुलमुखत्यारपत्र धारक
श्री.वरघीस नील अप्पाना,
वय : ५६ वर्षे, धंदा : नोकरी
राहणार फ्लॅट नं.५०४, एंजल अर्क मेहता सीएचएस,
प्लॉट नं.२३, सेक्टर ८, कळंबोली,
नवी मुंबई, महाराष्ट्र ४१०२१८ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

वरील अर्जदार यांची पत्नी मयत एजनीस बेंनसेली हिचा मृत्यू दि.०७/०७/२०१२ रोजी फ्लॅट नं.बी–२४/०२, केंद्रीय विहार, खारघर, नवी मुंबई–४१०२१० येथील राहत्या घरी झालेला आहे. सदर मयताचे मृत्यूची नोंद त्यावेळी पनवेल महानगरपालिका आरोग्य खाते (जन्म–मृत्यू विभाग), ता.पनवेल, जि.रायगड यांच्या कार्यालयात झालेली नसल्याने अर्जदाराने मयताचे मृत्यूदाखला मिळणेकरिता सदरचा अर्ज मा.न्यायालयात दाखल केलेला अहे.

**फ्लॅट नं.बी–१०३, बी–विंग, पहिला मजला,**
**साई स्वर सीएचएस लि., प्लॉट नं.२०, सेक्टर–२,**
**खारघर, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२१०**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदाराच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१४/०७/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.गोडसे मॅडम
अर्जदारातर्फे वकील : ॲड.एच.ए.भगत

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.६९७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१२/०८/२१

१) श्रीमती.दिव्या सुरेश फुलोरे — अर्जदार
विरुद्ध
श्रीमती.सुनिता शिवराम फुलोरे — सामनेवाले

ज्याअर्थी तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै.सुरेश शिवराम फुलोरे हे दि.१७/७/२०२० रोजी ठिकाण एम.जी.एम. हॉस्पिटल, कामोठे, नवी मुंबई येथे मयत झाले. मयत कै.सुरेश शिवराम फुलोरे यांचे मालकीच्या मिळकती होत्या. सदर मिळकतीचे वर्णन खलीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

**अ) मारुती कंपनीची वेगानर ग्रीन एल.एक्स.आय.कार मॉडेल सन २०१३, जिचा आर.टी.ओ. वाहन क्रमांक एम.एच.४६.एक्स.३७२९ असून जिची आजच्या बाजार भावाने किंमत अंदाजे रुपये ४०,०००/– इतकी होईल.**

**आ) होंडा कंपनीची मोटार सायकल सी.बी.झेड. एक्स्ट्रीम डी.एस.एस., मॉडेल सन २०११, जिचा आरटीओ वाहन क्रमांक एम.एच.४६.आर.९५२८ असून जिची आजच्या बाजारभावाप्रमाणे किंमत अंदाजे रुपये १०,०००/– इतकी होईल.**

**इ) एक सोन्याचे ब्रेसलेट व एक नेकलेस हार असे दागिने ज्याची आजच्या बाजारभावाप्रमाणे किंमत अंदाजे रुपये ४०,०००/– इतकी होईल.**

वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत मयत कै.सुरेश शिवराम फुलोरे यांचे वारसांनी म्हणजेच वर नमूद अर्जदारांनी मयत कै.सुरेश शिवराम फुलारे यांचे मृत्यूपश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत अशा आशयाचा वारस दाखला मिळणेसाठी ना.कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. सबब अर्जदार नं.१) श्रीमती.दिव्या सुरेश फुलोरे, २) कुमारी आराध्या सुरेश फुलोरे, ३) कुमारी स्पृहा सुरेश फुलोरे हे मयत कै.सुरेश शिवराम फुलोरे यांचे कायदेशीर वारसदार आहेत. या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीच्या कोणत्याही प्रकारच्या हरकती असल्यास त्या त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष कागदपत्रांसह हजर राहून लेखी घ्यावयाच्या आहेत. परंतु मुदतीत हरकती न आल्यास त्याचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.गोडसे मॅडम
ॲड.सुनील एन. मोरे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर/क.स्तर) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.७६०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२३/०८/२१

१) श्री.रोहिदास रामचंद्र वैद्य
वय : ७३ वर्षे, व्यवसाय : काहीही नाही
रा.२०२, गंगा भास्कर सोसायटी,
कोपरी व्हीलेज, ठाणे (पूर्व)
२) श्री.श्रीकांत रामचंद्र वैद्य
वय : ७३ वर्षे, व्यवसाय : काहीही नाही
३) श्री.सुरेंद्र रामचंद्र वैद्य
वय : ६० वर्षे, व्यवसाय : काहीही नाही
अर्जदार नं.२ व ३
दोघेही रा.५०३, अमये को.ऑप.हौसिंग सोसायटी
व्ही.एन.पुरव मार्ग, सुमन नगरच्या मागे,
चेंबुर मुंबई–४०००७१
४) श्री.रवींद्र रामचंद्र वैद्य
वय : ६७ वर्षे, व्यवसाय : काहीही नाही
रा.१०३, रिद्धी ॲव्हेन्यू को.ऑप.हौसिंग सोसायटी,
चिकुवाडी, शिंपोली, बोरीवली (प.) मुंबई ९२
५) सौ.दिप्ती दिलीप उपळेकर
लग्नापूर्वीचे नाव : कुमारी रत्नप्रभा रामचंद्र वैद्य
वय : ६८ वर्षे, व्यवसाय : घरकाम
रा.२०२, अे–विंग, दुसरा मजला,
शांती टॉवर, तामिळी संघ रोड,
मता लक्ष्मी हॉस्पिटल समोर, सायन मुंबई–४०००२२
६) सौ.चैत्रली रवींद्र हाटे
लग्नापूर्वीचे नाव : कुमारी प्रेमलता रामचंद्र वैद्य
वय : ६३ वर्षे, व्यवसाय : काहीही नाही
रा.सी/१०२, सोनी पॅराडाईस को.ऑप.हौसिंग
सोसासायटी, ओस्तवाल, वझीरा नाका, बोरीवली (प.)
मुंबई–९२ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ ते ६ यांची आई कै.रोहिणी रामचंद्र वैद्य यांच्या नावाने ७/१२ उतारा नोंदीत आहे. कै.राहिणी रामचंद्र वैद्य या दि.०३/०६/२००३ रोजी मयत झाल्या असून अर्जदार यांचे वडील कै.रामचंद्र जगन्नाथ वैद्य हे दि.०१/०४/१९९२ रोजी मयत झालेले आहेत. कै.रोहिणी रामचंद्र वैद्य यांच्या नावाने ७/१२ उतारा नोंदीत आहे. सदर मिळकती संदर्भात वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी मे.कोर्टास अर्ज केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : गुंडगे, ता.कर्जत, जि.रायगड येथील बिनशेती या हद्दीतील**

| अ.क्र. | भूमापन क्रमांक व उपविभाग | भूधारणा पद्धती | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | ४१/१०/अ/३४ | भोगवटदार वर्ग–१ | ४–६४–५० म्हणजेच ४६४.५० चौ.मी. | ९.३० |

वरील मिळकती संदर्भात अर्जार यांच्या नावाने वारस दाखला देण्याबाबत कुणाची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास वारस दाखला अर्जदारांच्या नावे प्रदान करण्यात येईल.

आज दि.१५/०७/२१ रोजी कोर्टाच्या सही शिक्क्याने दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## माथेरान रेल्वे स्टेशन मास्तरांचे नागरिकांना उत्तम सहकार्य



**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान रेल्वे स्टेशनमध्ये आजवर अनेक रेल्वे मास्तर कार्यरत होते अनेकांनी नेहमीच इथल्या नागरिकांना सहकार्याची साथ दिली आहे. तत्कालीन स्टेशन मास्तर रवींद्र मोरे यांची या गावाशी नाळ जुळलेली असल्याने आजही त्यांचे या गावावर निस्सीम प्रेम आहे. पावेल मास्तर, असोत की अन्य आतापर्यंत इथे कार्यरत असणाऱ्या सर्वांनी चांगल्या प्रकारे सेवा दिलेली आहे. तर काही वर्षांपूर्वी जी एस मीना हे सुध्दा या पदावर रुजू झाल्यापासून त्यांचे सुध्दा वेळोवेळी सहकार्य लाभले आहे.योगायोगाने त्यांच्या वाढदिवस निमित्ताने येथील प्रतिष्ठित व्यक्तींनी त्यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांना पुष्पगुच्छ देऊन पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी नगराध्यक्ष अजय सावंत, शिवसेनेचे शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी, नगरपरिषदेचे गटनेते तथा बांधकाम सभापती प्रसाद सावंत,माजी नगराध्यक्ष विवेक चौधरी, राष्ट्रवादीचे कार्यकर्ते अख्तर खान यांसह अन्य नागरिक उपस्थित होते.

## जोरदार पावसामुळे बोर्ली स्थानकावर पाणी : जनजीवन विस्कळित

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

गेले दोन तीन दिवस जोरदार पडत असलेल्या पावसामुळे मुरुड सह बोर्ली, मांडला, नांदगाव मजगांव उसरोली परीसराला जोरदार फटका बसला असून बोर्ली स्थानकावर तसेच नांदगाव मजगांव परीसरात मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्याने वाहतूक ठप्प होऊन जनजीवन विस्कळित झाले.पावसाळ्यापुर्वी सार्वजनिक बांधकाम व महसूल विभागाने योग्य नियोजन, उपाययोजना करण्यात न आल्याने बोर्ली सरपंच चेतन जावसेन यांनी ग्रामस्थांच्या वतीने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

गेल्या दोन दिवसांपासून कोकणात मान्सून सक्रिय झाला असून पावसाने जोरदार हजेरी लावली आहे.जोरदार पडत असलेल्या पावसामुळे काल रात्री अलिबाग व मुरुड तालुक्याला जोडणारा दुवा असलेला काशिद चा जूना पूल कोसळल्याने या मार्गावरील वाहतूक ठप्प झाली आहे तसेच उसरोली नदी ला पूर आल्याने सुपेगांव मार्गे वळविण्यात आलेली वाहतूक ठप्प झाली आहे. पावसामुळे कोर्लई, बोर्ली मांडला, बारशिव, काशिद, नांदगाव मजगांव उसरोली भागात अनेक ठिकाणी रस्त्यावर पाणी साचले तर काही ठिकाणी घरांमध्ये पाणी शिरले होते.

बोर्ली स्थानकावर मोठ्या प्रमाणावर पाणी साचण्यात संबंधित बांधकाम व महसूल विभागाच्या योग्य नियोजन व गलथान कारभारावर नाराजी व्यक्त होत असून बोर्ली–सुरई परीसरात होणारे अनधिकृत भराव यामुळे पुर्वी जे पावसाचे पाणी शेतातून निघून नदीला मिळत असे. परंतु भरावाने, पुर्वीच्या मो–या बंद झाल्याने, पाण्याचा निचरा होत नसल्याने रस्त्यावर येत आहे तसेच मुख्य रस्त्यालगत मो–यांवर टाकण्यात आलेले अनधिकृत स्लॅब पाण्याच्या प्रवाहाला अडथळा ठरत आहेत. यात महसूल व सार्वजनिक बांधकाम विभागाने योग्य प्रकारे नियोजन करून उपाययोजना करण्यात आल्या तर बोर्ली स्थानकावर पाणी साचण्याचा प्रश्न सुटू शकेल.यासाठी बोर्ली ग्रामपंचायत प्रयत्नशील राहिल.अशी प्रतिक्रियाही सरपंच चेतन जावसेन यांनी व्यक्त केली आहे.

# एकाच वेळी दोन ठिकाणी छापा टाकून दोन गावठी दारूच्या हातभट्ट्या उद्ध्वस्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल गुन्हे शाखा कक्ष २ ने एकाच वेळी दोन वेगवेगळ्या ठिकाणी छापा टाकून दोन गावठी दारुच्या हातभट्ट्या उद्धुस्त करून दोघांना ताब्यात घेतले आहे.



पोलीस आयुक्त बिपिन कुमार सिंग, अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे) डॉ. शेखर पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) प्रविन पाटील यांनी अवैधरित्या हातभट्टीवर गावठी दारू तयार करून विक्री करणाऱ्या इसमांवर कारवाई करण्याबाबत आदेशित केले होते. सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) विनोद चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली आदेशाप्रमाणे कार्यवाही करत असताना पनवेल् गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक गिरीधर गोरे यांनी स.पो.नि गणेश कराड, पो.उप.नी मानसिंग पाटील, वैभव रोंगे स.पो.उप.नी साळुंखें, पो.ह.प्रशांत काटकर, अनिल पाटील, वाघ, रुपेश पाटील, इंद्रजित कानू, प्रफूल मोरे, सचिन पवार, प्रवीण भोपी, संजय पाटील, आदिनाथ फुंदे, सुनील कुडले, निलेश पाटील, सूर्यवंशी, दीपक डोंगरे, यांची दोन पथके तयार करून ऐकाच वेळी बंबावीपाडा झोपडपट्टी,कुंडे वहाळ, ता. पनवेल व दिघोदे येथे अवैधरित्या हातभट्टी वर गावठी दारू तयार करून विक्री करत असल्याबाबत मिळालेल्या माहिती वरून ऐकाच वेळी दोन्ही ठिकाणी छापा टाकून आरोपी इसम राजू व्यंकया नायक, वय ३० वर्षे, रा. बंबावीपाडा झोपडपट्टी, कुंडेवहाळ, ता. पनवेल व अंनत मोतीराम पाटील रा. ठी. दिघाटी ता.पनवेल यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याच्या कब्जात मिळून आलेली गावठी दारू व गावठी दारू तयार करण्यासाठी लागणारे गुळमिश्रित आंबवलेले मिश्रण मिळून आले. त्यापैकी गुळमिश्रित आंबवलेले मिश्रण व भट्टी जागीच नष्ट करण्यात आले असून सदर आरोपी इसमावर मुंबई दारूबंदी अधिनियमान्वये पनवेल शहर व पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे स्वतंत्र गुन्हें दाखल केले आहेत.

# माथेरानमध्ये सत्कार एका असामान्य कर्तृत्वाचा



**दै.रायगड नगरी । माथेरान**

राजकारण असो किंवा समाजकारण ह्या दोहींची सांगड घालताना अंतर्गत मतभेद वा कोणत्याही प्रकारचा आकस न ठेवता निः पक्षपाती पणाने कामे मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केल्यास साहजिकच विरोधाची भूमिका पार पाडणारे सुध्दा आपसूकच जवळ येऊन सहकार्याची साथ देत असतात.

माथेरान मध्ये राजकीय क्षेत्रात अग्रेसिव्ह असणारे शिवसेना, राष्ट्रीय काँग्रेस पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे तीन प्रमुख पक्ष कार्यरत आहेत. तर अन्य पक्ष सुध्दा आपापल्या परीने जनतेची कामे करण्यासाठी नेहमीच पुढाकार घेत आहेत. नगरपरिषदेच्या सभागृहात २०१६ च्या नगरपरिषदेच्या निवडणुकीत शिवसेनेचे एकहाती वर्चस्व प्रस्थापित झाले आहे.त्यामुळे विरोधात असणारे सध्यातरी एकमेव राष्ट्रीय काँग्रेस पक्ष असून आजवरच्या साडेचार वर्षात काही अपवाद वगळता त्यांनीही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे सत्ताधारी गटाला सहकार्य केलेले आहेच यात शंकाच नाही.यातूनही एकहाती सत्ता असताना सुध्दा सर्वांशी मिळतेजुळते घेत केवळ गावाची विकास कामे कशाप्रकारे पूर्ण करून सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून देता येईल यासाठी शिवसेनेचे शिलेदार नेहमीच प्रयत्नशील आहेत.शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी यांच्या नेतृत्वाखाली आणि गटनेते प्रसाद सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांच्या अभ्यासपूर्ण कार्यपद्धती मुळे अनेक विकास कामे जवळजवळ पूर्ण झा–लेली आहेत.

गावाच्या प्रथम नागरिक म्हणून नगराध्यक्षा प्रेरणा सावंत या स्वताच्या पक्षाबरोबर अन्य पक्षातील महिला वर्गांना सुध्दा वेळोवेळी सहकार्य करीत असतात. त्यामुळेच त्यांनी महिला वर्गामध्ये एक वेगळाच ठसा उमटवला आहे. नुकताच प्रेरणा सावंत यांना त्यांच्या एकंदरीत कार्यपद्धती मुळे एका वर्तमानपत्राच्या माध्यमातून गौरविण्यात आले होते.

त्यावेळी सर्व स्तरावरून त्यांच्यावर सोशल मीडियाच्या माध्यमातून शुभेच्छाचा वर्षाव करण्यात आला होता तर यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिलांनी स्वतः त्यांच्या घरी जाऊन आजवर केलेल्या अनेक लोकाभिमुख कामांवर खुश होऊन निप–क्षपणे केलेल्या कामांची पोचपावती म्हणून पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांच्या कार्याचा आलेख नेहमीच चढता असावा यासाठी एक रोप सर्वांनी मिळून त्यांना यावेळी दिले आहे जेणेकरून रोपांची उंची ज्याप्रमाणे वाढत जाईल त्याप्रमाणे त्यांच्या कार्याची उंची सुध्दा सातत्याने वाढत जावो असा संदेश यानिमित्ताने देण्यात आला आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्नेहा चव्हाण, स्वाती कुमार, गायत्री पवार, रुपाली कोळी, यामिनी भोसले, मिताली कदम, संगीता कोळी आदी उपस्थित होत्या.

# सावधान, पिण्याचे पाणीच ठरू शकते आजाराचे कारण!

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा व भूजल विभागाकडून दर तीन महिन्यानी तपासल्या जाणाऱ्या दूषित पाण्याच्या नमुन्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसून येत आहे. पनवेल तालुक्यात जानेवारी ते जून महिन्यात तपासलेल्या २०० नमुन्यांपैकी ४२ नमुने दूषित आढळले आहेत. त्यामुळे जीवन असणारे पिण्याचे पाणी हेच आजाराचे कारण ठरू शकते. त्यामुळे आरोग्याची काळजी घेण्याची गरज निर्माण झाली आहे.

पनवेल तालुक्यातील दूषित निघालेल्या गावांतील पाण्यामुळे मोठ्या प्रमाणावर आजार फैलावण्याची शक्यता नाकारता येत नाही. शुद्ध पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची असल्याने ग्रामपंचायतीने आवश्यक त्या उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. पाणी नमुने दूषित आढळलेल्या गावांतील जलस्रोत शुद्धिकरण करण्याची विशेष मोहीम हाती घेण्याची गरज आहे. आरोग्य विभागाकडून दरवर्षी पावसाळा सुरू होण्यापूर्वी ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचे नमुने तपासले जातात. मात्र दूषित आढळुन येत असलेल्या पाण्यामुळे नागरिकांच्या जीवाला धोका उद्भवु शकतो आणि नागरिक आजारी पडू शकतात. ग्रामीण भागात बहुतांश पाणीपुरवठा करणाऱ्या योजनांच्या विहिरी या नदी, ओढ्यांच्या काठी आहेत. त्यामुळे या नदी व ओढ्यांना पूर आल्यानंतर पुराचे पाणी या विहिरींमध्ये जाते. ग्रामीण भागात खाजगी विहिरी, बोअर या जलस्रोतांजवळ मोठ्या प्रमाणात घाण पाणी साचते. त्यामुळे ग्रामस्थांनी पाणी पिताना ते पाणी उकळून पिण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. आरोग्य विभागाकडून दर तीन महिन्याला ग्रामीण भागातील गावातील पाणी नमुने तपासले जातात. मात्र कोरोनाच्या पार्श्व भूमीवर अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्रत्येक गावातील पाणी नमुने तपासण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागला.

# महाराष्ट्रातील अध्यात्मिक कार्यक्रमांवर बंदीबाबतचे प्रांताधिकारी यांना निवेदन

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

पायी वारी आषाढी २०२१ व महाराष्ट्रातील देव व संतांचे सोहळे, मंदिरे आणि समाजाचे सांस्कृतिक जीवनमान उंचावणारे अध्यात्मिक कार्यक्रमांवर अन्यायकारक बंदी बाबत तसेच महाराष्ट्रातील संतविर प.पु. बंडातात्या कराडकर यांना स्थानबद्ध करून अमानुषपणे एखाद्या देशद्रोहासारखे वागणूक दिल्याप्रकरणी राज्य सरकारच्या अन्यायकारक कृतीचे समस्त वारकरी समाजात याचे तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. याबाबत रोहा तालुका पंचक्रोशीतील वारकरी सांप्रदायाने जाहीर निवेदन प्रांत अधिकारी डॉ.यशवंतराव माने यांच्याकडे देण्यात आले.

महाराष्ट्रातील संतविर प.पु.बंडा तात्या कराडकर यांनास्थानबद्धकेल्या प्रकरणी संपुर्ण महाराष्ट्रात तमाम वारकरी बांधवा मध्ये, तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे, ही संतापाची लाट अधिक तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही.स्थानबद्ध काय किंवा नजरकैद काय, सरकारच्या या अविचारी कृत्यामुळे प. पु. तात्या हे ५० वर्षांच्या पारमार्थिक साधनेपासून वंचित झाले आहेत.

महाराष्ट्रात राजकीय मेळावे, सभा, चित्रपट, बार, दारू दुकाने, इस्लामिक सण, चालू असताना केवळ वारकऱ्यांवर एकतर्फी केलेला अन्याय हा असंवैधानिक आहे. याप्रसंगी स्वा. सु.निवासी गुरुवर्य अलिबागकर महाराज प्रेमवर्धक संप्रदाय कोकणप्रांत अध्यक्ष मारुती कोल्हटकर, स्वानंद सुख निवासी गुरुवर्य अलिबागकर महाराज प्रेमवर्धन वारकरी संप्रदायाचे संस्थापक दळवी गुरुजी, अध्यक्ष बाळाराम शेळके, हभप.राम आंबेकर, एम.एम.पाटील, केशव म्हस्के आदी उपस्थित होते.

# पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांचा रायगड जिल्हा दौरा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्याच्या उद्योग आणि खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, विधी व न्याय, माहिती व जनसंपर्क, राज्यमंत्री तथा पालकमंत्री ना.कु.आदिती तटकरे या शुक्रवार दि.१६ जुलै २०२१ रोजी सकाळी ८.३० वा. सुनिती शासकीय निवासस्थान मुंबई येथून शासकीय वाहनाने सातिर्जे ता.अलिबागकडे प्रयाण. सकाळी ११.३० वा. सातिर्जे, ता.अलिबाग येथे आगमन व ॲड.प्रविण मधुकर ठाकूर यांच्याकडे सांत्वनपर भेट. सकाळी ११.४५ वा सातिर्जे येथून शासकीय वाहनाने अलिबागकडे प्रयाण. दुपारी १२.१५ वा. अलिबाग येथे आगमन व पत्रकार परिषद स्थळ : महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ अलिबाग विश्रामगृह. दुपारी १२.४५ वा. ते १.०० वा. राखीव. दुपारी १.०० वा. अलिबाग येथून शासकीय वाहनाने मुरुडकडे प्रयाण. (मार्गे रेवदंडा–साळाव–सुपेगाव–मजगाव). दुपारी २.०० वा. मुरुड येथे आगमन व आदिवासी उपयोजनांतर्गत खावटी अनुदान किट वाटप कार्यक्रमास उपस्थिती. स्थळ : पंचायत समिती हॉल, मुरुड. दुपारी २.३० वा. मुरुड शहरामध्ये अतिवृष्टीमुळे बाधित क्षेत्राची पाहणी. त्यानंतर मुरुड येथून शासकीय वाहनाने मुंबईकडे प्रयाण.

## ग्रामपंचायत आकुर्ली

**ता.पनवेल, जि.रायगड**

जा.क्र.१०३/ग्रा.पं./आस्था २०
दि.१५/०७/२०२१

यादृारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलाचे ग्रामपंचायत आकुर्ली कर आकारणी नोंद वहितील नावात बदल करण्याबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालील प्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.
(वाचा : मुंबई ग्रामपंचायत अधिनियम ८ नियम ३२ (१))

| अ.क्र. | भाग क्र. | स.नं./प्रॉ.नं./फा.प्लॉट/ सदनिका/गाळा नं. | जुने नाव | नवीन नाव |
|---|---|---|---|---|
| १ | | आशिर्वाद रेसिडेन्सी आकुर्ली ४०३/१०३ | आशिर्वाद डेव्हलपर्स तर्फे भागीदार विकास प्रकाश करोशे | विजय मनोहर तोरस्कर |
| २ | | आशिर्वाद रेसिडेन्सी आकुर्ली ४०३/१०३ | आशिर्वाद डेव्हलपर्स तर्फे भागीदार अनिकेत दिलीप माने | हरिश अनंत पवार निखिल अनंत पवार |
| ३ | | एन सी रेसिडेन्सी आकुर्ली ४०२/१०३ | मे.एन.सी.डेव्हलपर्स तर्फे भागीदार विनोद तुकाराम चांदे | संदेश तुकाराम नाचरे |
| ४ | | एन सी रेसिडेन्सी आकुर्ली ४०२/०४ | मे.एन.सी.डेव्हलपर्स तर्फे भागीदार विनोद तुकाराम चांदे | जयेश श्रीभास्कर भालेराव स्मिता जयेश भालेराव |
| ५ | | एन सी रेसिडेन्सी आकुर्ली ४०२/३०४ | मे.एन.सी.डेव्हलपर्स तर्फे भागीदार विनोद तुकाराम चांदे | रितेश राहूल तांबे रेश्मा राहूल तांबे |
| ६ | | एन सी रेसिडेन्सी आकुर्ली ४०२/३०१ | मे.एन.सी.डेव्हलपर्स तर्फे भागीदार विनोद तुकाराम चांदे | विशाल श्रीरंग बांदल केशव श्रीरंग बांदल |
| ७ | | पुष्पशेवंती आकुर्ली ३५०/B/३०२ | हरिओम बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे प्रो.प्रा.राकेश बन्सल | संदीप दत्तात्रेय कांबळे अरुधंती एस कांबळे |
| ८ | | पनवेल पॅराडाईज आकुर्ली ३६०/E/१०३ | गौरव किशोर पवार वैदेही गौरव पवार | विवेंद्र दत्तात्रेय नाईक वैदेही विवेंद्र नाईक |
| ९ | | पनवेल पॅराडाईज आकुर्ली ३६०/D/२०४ | मे.आशियाना रिअल्टी तर्फे भागीदार धवल जे पटेल | वज्रेश्वरी मुना बेहेरा मुना अभिमन्यू बेहेरा |
| १० | | मातेश्वरी कॉम्प्लेक्स आकुर्ली ३०८/H/१०३ | फादर जोजी जॉर्ज | जीजो अब्राहम थॉमस अब्राहम थॉमस जीन्स अब्राहम थॉमस |
| ११ | | विघ्नहर्ता रेसिडेन्सी आकुर्ली २६९/C/०४ | अमृता पांडे | विवेक गजानन वावेकर अक्षता विवेक वावेकर |

वरील बाबत प्रकरण परत्वे आवश्यकतेनुसार ग्रामपंचायत आकुर्ली कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्याच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचारधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असल्यास सदर नोटीसीचे प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसाचे आत ग्रामपंचायत आकुर्ली कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरील प्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारींची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरण मुंबई ग्रामपंचायत अधिनियम प्रकरण ८ नियम ३२ (१) नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

सही/–
सौ.भारती सचिन पाटील
सरपंच
ग्रामपंचायत आकुर्ली
ता.पनवेल, जि.रायगड

सही/–
श्री.जयेंद्र घनशाम म्हात्रे
ग्रामसेवक
ग्रामपंचायत आकुर्ली
ता.पनवेल, जि.रायगड

## कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय

**ठाणे विद्युत विभाग, सा.बां.विभाग, सा.बां.परिसर,
मराठी ग्रंथ संग्रहालयाजवळ, स्टेशन रोड,
ठाणे (पश्चिम) पिन कोड–४००६०१**

जा.क्र.काअ/ठाविवि/निविदा–१/२०२७/सन २०२१ — दिनांक १२ जुलै २०२१

**फेर ई निविदा सूचना क्र.२० सन २०२१–२०२२**

संदर्भ : १) महाराष्ट्र शासन सा.बां.विभाग, मंत्रालय मुंबई, शासन निर्णय क्र.सीटी/२०१७/प्र.क्र.८/इमारती–२ दिनांक २७ सप्टेंबर २०१८

कार्यकारी अभियंता, ठाणे विद्युत विभाग, सा.बां.विभाग, परिसर, ठाणे (पश्चिम), दूरध्वनी क्र. (०२२) २५३३३१४४ हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामाकरिता ब–१ नमुन्यातील टक्केवारी दर (Percentage Rate) ई–निविदा (ऑनलाईन) प्रणालीद्वारे निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, ठाणे विद्युत विभाग, सा.बां.विभाग, सा.बां.परिसर, ठाणे (पश्चिम), दूरध्वनी क्र. (०२२) २५३३३१४४ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

| अ. क्र | कामाचे नाव | कामाची अंजित रक्कम रु. | ई–निविदा उपलब्ध कालावधी | निविदापूर्व बैठक/ठेकेदारांचा वर्ग/इसारा रक्कम/ कोरा निविदा शुल्क | ई–निविदा उघडणे |
|---|---|---|---|---|---|
| १ | Est. No. : PESD/Mahad/4801/ 2021-22 Providing 62.5 Kva DG Set at Sub Dist Hospital Shriwardhan for Covid-19, Tal. Shriwardhan Dist-Raigad | Rs 8,99,392/- | दि.१६/०७/२०२१ सकाळी ११.०० वाजेपासून दि.२३/०७/२०२१ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत | निविदापूर्व बैठक नाही ठेकेदारांचा वर्ग–क व त्यावरील नोंदणीकृत विद्युत ठेकेदार ज्यांना अशा प्रकारचे काम केल्याचा अनुभव आहे. इसारा रक्कम रु.९,०००/– निविदा शुल्क रु.५००/– अधिक वस्तू व सेवा कर | दि.२६/०७/२०२१ सकाळी ११.०० |

खालील संकेतस्थळावर ई–निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१) https://mahapwd.com
२) https://mahatenders.gov.in (सदर निविदासुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३) कार्यकारी अभियंता, ठाणे विद्युत विभाग, सा.बां.विभाग, सा.बां.परिसर, ठाणे (पश्चिम), दूरध्वनी क्र.(०२२) २५३३३१४४ कार्यालयातील सूचना फलक.
४) वरील कामांकरिता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये नोंदणीकृत विद्युत ठेकेदार व उद्योग, ऊर्जा, कामगार विभागाकडील विद्युत अनुज्ञाप्तीधारक विद्युत ठेकेदार यासह ज्यांना तत्सम प्रकारचे काम यशस्वीपणे पुर्ण केल्याचा अनुभव आहे असे कंत्राटदार निविदा सादर करू शकतात.

सही/–
(र. शि. पाटील)
कार्यकारी अभियंता (विद्युत)
ठाणे विद्युत विभाग, सा.बां.विभाग, ठाणे

क्र.जिमाका/राअ/जाहि/१०३४/२०२१–२२